आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

दिनांक : 27.11.2026 **वार : शुक्रवार**

ठळक बातम्या

1. अत्यावश्यक सरकारी कामकाज पूर्ण करण्यासाठी 30 नोव्हेंबरला लोकसभेची तर 2 डिसेंबरला राज्यसभेची विशेष बैठक.
2. दिल्लीत आजपासून राष्ट्रीय पातळीवरील बालविवाहमुक्त भारत उपक्रमाचा प्रारंभ.
3. भारत आज इंडियन ओशन रिम असोसिएशनच्या 25वी बैठकीचं यजमानपद भूषवणार.
4. महाराष्ट्रात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून 4,824 कोटींहून अधिक रुपयांची अग्रीम मदत वितरीत.
5. ख्राइस्टचर्च इथं भारत-न्यूझीलंड पुरुषांच्या दुसऱ्या कसोटी सामन्याला सुरुवात.

सविस्तर बातम्या

संसद विशेष बैठक

अत्यावश्यक कामांच्या पूर्ततेसाठी लोकसभा आणि राज्यसभेची पुन्हा बैठक बोलवण्यात आली आहे. येत्या 30 नोव्हेंबर रोजी लोकसभेची बैठक सुरू होणार आहे तर राज्यसभेचं कामकाज 2 डिसेंबरपासून सुरू होईल. केंद्राने लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष, उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन यांना सभागृहांची बैठक पुन्हा बोलवण्याची विनंती केली होती. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी समाजमाध्यमांवर काल ही माहिती दिली. या बैठकींदरम्यान प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर आणि खासगी सदस्यांची प्रश्नोत्तरे होणार नाहीत.

दिल्ली बालविवाह

महिला आणि बाल विकास मंत्रालय आज दिल्लीत राष्ट्रीय पातळीवरील बालविवाहमुक्त भारत उपक्रमाचा प्रारंभ करणार आहे. देशातील बालविवाहाची समस्या दूर करण्यासाठी सर्वांगीण सरकार आणि समाजाच्या सहभागाचा दृष्टीकोन अवलंब केला जाणार आहे. 2 वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या राष्ट्रीय मोहिमेच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त हा उपक्रम आयोजित केला आहे. विविध राज्ये, केंद्रशासित प्रदेश, विविध मंत्रालयं, बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, बालकल्याण समितीचे सदस्य तसंच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे आणि नागरी समाज संस्थांचे प्रतिनिधी या उपक्रमात एकत्र येतील. या कार्यक्रमातून बालविवाहमुक्त भारताच्या निर्माणासाठीची वचनबद्धता दृढ केली जाईल. संयुक्त राष्ट्रांनी 27 डिसेंबर हा लवकर आणि सक्तीच्या बालविवाह निर्मूलन दिवस घोषित केला आहे.

आय ओ आर ए बैठक

भारताच्या वतीनं आज नवी दिल्लीत इंडियन ओशन रिम असोसिएशन म्हणजे आयओआरए च्या 25वी बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांच्यासह सेशेल्सचे

परराष्ट्र व्यवहार मंत्री बॅरी फॉरे, मॉरिशसचे परराष्ट्र व्यवहार मंत्री धनंजय रामफुल आणि श्रीलंकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री विजिता हेराथ यांच्यासह इतर महत्त्वाच्या व्यक्ती सहभागी होत आहेत. हिंदी महासागर क्षेत्रात नावीन्य, खुलेपणा, लवचीकता आणि अनुकूलन क्षमता हा भारताच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीचा मुख्य विषय आहे. हिंद प्रशांत क्षेत्राच्या दृष्टीनं ही महत्त्वाची बैठक असून, प्रादेशिक सहकार्याच्या आराखड्यांचा आढावा आणि नवीन क्षेत्रांचा शोध घेण्यावर बैठकीत भर दिला जाणार आहे. या बैठकीतून, मुक्त, सर्वसमावेशक आणि नियमांवर आधारित सागरी व्यवस्थेसाठीच्या महासागर या संकल्पनेप्रती भारताची असलेली वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित होणार आहे.

एस. जयशंकर

आयओआरए बैठकीच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी काल दिल्लीत श्रीलंका, सेशेल्स, मॉरिशस या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली. श्रीलंकेच्या समपदस्थांशी त्यांनी उभय देशांतील द्विपक्षीय संबंध आणि प्रादेशिक परिस्थितीवर चर्चा केली. तसंच मालदीव्जचे परराष्ट्र मंत्र्यांसोबतच्या भेटीत बहुपक्षीय, सुरक्षा आणि विकास सहकार्य यांवर चर्चा केली. तत्पूर्वी सेशेल्सच्या परराष्ट्र मंत्र्यांसमवेतच्या भेटीत आरोग्य, संपर्कव्यवस्था, कौशल्य विकास, ऊर्जा आणि सायबर आणि कृत्रीम बुद्धिमत्त यांच्याशी निगडीत लोककेंद्रित भागीदारी बळकट करण्याच्या दोन्ही देशांच्या सामाईक वचनबद्धतेचा पुनरूच्चार दोन्ही नेत्यांनी केला. तर मॉरिशिअसचे परराष्ट्र मंत्री धनंजय रामफूल यांची भेट घेऊन विशेष आर्थिक पॅकेजअंतर्गत झालेल्या प्रगतीसह द्विपक्षीय संबंधांच्या प्रमुख क्षेत्रांचा आढावा घेतला.

राष्ट्रपती मुर्मू-पूल-विजया

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून 2 दिवसांच्या केरळम् च्या दौऱ्यावर जात आहेत. आज सकाळी कोची इथं पोहोचल्यावर त्या आदी शंकराचार्यांच्या जन्मभूमीला भेट देणार आहेत. तसंच वैद्यरत्नन आयुर्वेद महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव कार्यक्रमाचं अध्यक्ष म्हणून उपस्थित राहातील. दोन दिवसांत राज्यातील इतर कार्यक्रमांना त्या उपस्थित राहाणार आहेत.

आय आय टी एफ

दिल्लीत आज 45वा इंडिया इंटरनॅशनल ट्रेड फेअर भारत मंडपम् इथं होणार आहे. भारतीय व्यापार प्रोत्साहन संस्थेच्या वतीनं दरवर्षी या व्यापार प्रदर्शनाचं आयोजन केलं जातं. बहुउत्पादन व्यापार प्रदर्शनांपैकी हे प्रदर्शन आहे. यंदा विकास आणि विरासत असं प्रदर्शनाचं विषयसूत्र आहे. या मेळाव्यातील पुरस्कार वितरण समारंभ काल पार पडला, त्यात विविध गटांमध्ये राज्यांना गौरवण्यात आलं.राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या श्रेणीत, तामिळनाडूला सुवर्ण , केरळला रौप्य, मध्य प्रदेशला कास्य पुरस्कार देण्यात आला. त्रिपुरा राज्याला प्रशस्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मंत्रालये आणि सरकारी विभाग श्रेणीत, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाला सुवर्ण पदक, रेल्वे मंत्रालयाला रौप्य पदक आणि वस्त्रोद्योग मंत्रालयाला कास्य पदक मिळाले. पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्रासह बिहार, राजस्थान आणि उत्तर प्रदेश यांना भागीदार राज्यं म्हणून, तर आसाम, दिल्ली, झारखंड आणि पश्चिम बंगाल यांना केंद्रित राज्ये म्हणून मान्यता देण्यात आली.

जहाज बांधणी

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सायप्रसच्या जहाजबांधणी उपमंत्र्यांची काल दिल्लीत भेट घेतली. या बैठकीत जहाजबांधणी, जहाज पुनर्वापर, खलाशी प्रशिक्षण आणि जहाजबांधणी

क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधी वाढवण्यावर भर देण्यात आला. आगामी काळात या धोरणात्मक भागीदारीसाठी दोन्ही देश उत्सुक असल्याचं सोनोवाल यांनी सांगितलं.

महाराष्ट्र दुष्काळ मदत

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून 4,824 कोटींहून अधिक रक्कम राज्य सरकारकडून देण्यात आले आहेत. 96 लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बँक खात्यात ही थेट मदत जमा झाली आहे. महाराष्ट्र सरकारनं आतापर्यंत 310 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून, बाधित शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रीम मदतही देऊ केली आहे. राज्यातील अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वाधिक लाभार्थ्यांची नोंद जाली आहे. त्या खालोखाल बीड, नांदेड जिल्ह्यातल अधिक शेतकऱ्यांना मदत मिळाल्याची माहिती महाराष्ट्राचे मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

अन्नधान्य-विक्रमी उत्पादन

देशात यंदाच्या वर्षी अन्नधान्याचं विक्रमी उत्पादन झालं असल्याची माहिती केंद्रीय कृषी आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली. 2025-26 या वर्षात अन्न-धान्याचं 37 कोटी 80 लाख टन उत्पादन झालं असून, गेल्या वर्षीपेक्षा ते 203 लाख टनांनी अधिक असल्याचं ते म्हणाले. जगातील सर्वात मोठा भात उत्पादक देश हे स्थान कायम ठेवत गव्हाच्या उत्पादनातही भारतानं जगात दूसरा क्रमांक राखला असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

जंगल वणवे

उत्तराखंड उच्च न्यायालयाने राज्यातील जंगलांमध्ये वणव्यांमुळे लागणाऱ्या आगींची दखल घेत स्वतःहून दाखल केलेल्या याचिकेवर काल सुनावणी केली. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती मनोज कुमार तिवारी आणि न्यायमूर्ती सिद्धार्थ साह यांच्या खंडपीठाने वणवे रोखण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारला चार आठवड्यांच्या आत नवीन शपथपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

गोवा-इफ्फी

गोव्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज आठवा दिवस आहे. दिवसभरात आज 'द लिजेंडरी 25' या चर्चासत्रात चित्रपट निर्माते व अभिनेते फरहान अख्तर, चित्रपट निर्माते आशुतोष गोवारीकर आणि दिग्दर्शक मधुर भांडारकर सहभागी होणार आहेत.तसंच पंचायत मालिकेच्या पाचव्या सिझनचा पहिल्या भागाचे विशेष प्रदर्शन होणार आहे. इफ्फीचा उद्या समारोप होणार आहे.

महिला आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी

भोपाळ इथं सुरू असलेल्या महिला आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत आज संध्याकाळी 7 वाजता भारताचा मलेशियाविरुद्ध सामना होणार आहे. बुधवारी जपानवर मात केल्यानंतर भारतानं गुणतालिकेत पहिलं, तर जागतिक क्रमवारीत चौथं स्थान पटकावलं आहे.

बुद्धिबळ

जिनीव्हा इथं सुरू असलेल्या फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या तिसऱ्या डावात भारताच्या डी. गुकेश यानं जावोखीर सिंदरोव याला बरोबरीत रोखले.आज विश्रांतीचा दिवस आहे आणि दोन्ही खेळाडू प्रत्येकी

दीड गुणांसह बरोबरीत आहेत. एकंदर 14 डावांच्या या स्पर्धेतील हा तिसरा डाव होता. स्पर्धेत साडेसात गुण मिळवणारा खेळाडू विजेता ठरणार आहे.

रायझिंग स्टार्स

दोहा इथं सुरू असलेल्या आशिया करंडक रायझिंग स्टार्स् स्पर्धेत श्रीलंका 'अ' संघ भारताला हरवून अंतिम फेरीत पोहोचला आहे. स्पर्धेतील पहिल्या उपांत्य सामन्यात भारतानं दिलेल्या 318 धावांचं लक्ष्य श्रीलंकेच्या संघानं 41 षटकांत 2 गडी गमावून गाठलं. भारताच्या अभिषेक वर्मानं 78 तर श्रीलंकेच्या सिनेथ जयवर्धने यानं 105 धावा केल्या. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं.

क्रिकेट

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, न्यूझीलंडमध्ये ख्राइस्टचर्च इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. न्यूझीलंडनं आपल्या पहिल्या डावात आतापर्यंत 4 गडी बाद 131 धावा केल्या आहेत.

हवामान

देशात दिल्ली, पंजाब, हरियाणा, चंदीगड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश आणि देशाच्या ईशान्येकडील भागांत दाट धुक्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.तर उद्यापर्यंत पूर्व राजस्थानमध्ये थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.तर दक्षिणेकडील काही राज्यात मुसळधार पावसासह वादळ, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.